**नि.फौ.ख.क्र. ८३/२०२३**
सरकार वि. किशोर
निशाणी क्र. १४

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : प्रफुल्ल केशवराव घायर,
वय : ३० वर्ष, कामधंदा – शेती
राहणार : देउरवाडा ,ता. चांदुर बाजार जि. अमरावती

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. कावरे यांचे तर्फे</u>**

**१.** आरोपी माझा मित्र असल्याने मी त्याला ओळखतो. मी फिर्यादीला ओळखत नाही. दि. २१.०१.२०२३ रोजी मी गावातील चौकात बसलेलो असतांना पोलीसांनी मला बोलावुन माझी पंचनाम्यावर सही घेतली होती. पंचनामा कशासंदर्भात होता हे मला त्यांनी सांगितले नव्हते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर मला माहीत नाही. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यावरील सहीपुरता **नि.क्र.१५** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांनी साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, २१.०१.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी आरोपीच्या राहत्या घरी बोलविले होते. पंचनामा आरोपी व फिर्यादी यांच्यात वादविवाद झाल्याने करण्यात आला होता किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचुन दाखविला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा मित्र असल्याने त्याला वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

सरतपास संपला.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एस. भुस्कडे यांचे मार्फत</u>**

३. नाकारला.

**उलटतपास संपला, फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष,

दि. ११.०३.२०२५

( पी. एम. चव्हाण )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. २) चांदूर बाजार.

**नि.फौ.ख.क्र. ८३/२०२३**
सरकार वि. किशोर
निशाणी क्र. १२

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**</u>
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : सुरज जगनराव भलावी,
वय : २४ वर्ष, कामधंदा – मजुरी
राहणार : देउरवाडा , ता. चांदुर बाजार जि. अमरावती

<u>**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. कावरे यांचे तर्फे**</u>

**१.** मी आरोपीला ओळखतो. मी फिर्यादीला ओळखत नाही. दि. २१.०१.२०२३ रोजी पोलीस आरोपीच्या घराजवळ आले होते. त्यांनी पंचनाम्यावर मला सही करण्यास सांगितले होते. पंचनामा कशासंदर्भात होता हे मला त्यांनी सांगितले नव्हते. पंचनामा आरोपीच्या घरी केला होता. याव्यतिरीक्त मला काही माहीत नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर मला माहीत नाही. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यावरील सहीपुरता **नि.क्र.१३** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांनी साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.)**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, २१.०१.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी आरोपीच्या राहत्या घरी बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांच्यात वादविवाद झाल्याने पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचुन दाखविला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचा असल्याने त्याला वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

सरतपास संपला.

<u>**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एस. भुस्कडे यांचे मार्फत**</u>

**३.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यात काय लिहुन घेतले होते हे मला माहीत नाही.

**उलटतपास संपला, फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष,

दि. ११.०३.२०२५ ( पी. एम. चव्हाण )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. २) चांदूर बाजार.